Tipni.lwp


# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय

**नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे -१**

फोन नं. २०-२६१२२८४६/४७ E-mail- commcoop२०११@gmail.com


जा. क्र. गृह/डी-३/अपसेट प्राईज/आदेशिका खर्च/१४-सआ दिनांकः- १८ जून, २०१९

**वाचावे** :- (१) या कार्यालयाचे क्र. पतसंस्था/सं.आ-५/खर्च/वसूली आदेश/२०१८/८७२, दिनांक ६.४.२०१८ चे आदेश.

(२) अध्यक्ष, दि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन लि., अकोला यांचे दिनांक २९.३.२०१९ चे पत्र.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ नुसार अ) संस्थेने मिळविलेल्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम, ब) निबंधक किंवा परिसमापक यांचा निर्णय, निवाडा किंवा आदेश याअन्वये येणे असलेली कोणतीही रक्कम, क) या अधिनियमान्वये खर्च म्हणून निवाडयाने दिलेली रक्कम, ड) संस्थेच्या मत्तेत अंशदान म्हणून या अधिनियमान्वये जी रक्कम देण्यासाठी आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही रक्कम, इ) कलम १०१ च्या पोटकलम (१) किंवा (२) अन्वये किंवा कलम १३७ च्या पोटकलम (१) अन्वये निबंधकाने दिलेल्या प्रमाणत्रानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम आणि अशा रकमेवर किंवा एकूण रकमेवर कोणतेही व्याज देय असल्यास असे व्याज आणि निबंधकाने वेळोवेळी घालून दिलेल्या फी च्या प्रमाणानुसारचा आदेशिकेचा खर्च (cost of process) ज्या व्यक्ती विरुध्द असा हुकूमनामा, निर्णय, निवाडा किंवा आदेश मिळवण्यात किंवा देण्यात आला असेल अशा व्यक्तीच्या मालमत्तेवर जप्ती आणून, तीची विक्री करुन किंवा जप्ती शिवाय तिची विक्री करुन वसुल करता येईल. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (२) अनुसार वसूलीच्या कारवाईच्या खर्चाचे प्रमाण वेळोवेळी सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे, निबंधकाकडून निश्चित करण्यात येईल.

या कार्यालयाने दिनांक ६.४.२०१८ अन्वये वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) निश्चित केला आहे. तथापि दि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन लि., अकोला यांनी दिनांक २९.३.२०१९ च्या पत्रान्वये असे निदर्शनास आणून दिले आहे की, गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या वसुली दाखल्याप्रमाणे येणेबाकी कमी असते, त्यातच फेडरेशनला इतर गृहनिर्माण सहकारी संस्थांची थकित रक्कम वसुली अधिकाऱ्यामार्फत वसुली करावी लागते. या कार्यालयाच्या दिनांक ६.४.२०१८ च्या आदेशानुसार ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा आदेशिकेचा खर्च जास्त होतो व सदरचा खर्च फेडरेशनला वहन करावा लागतो. म्हणून दिनांक ६.४.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये नमूद आदेशिकेच्या खर्चाची मर्यादा वाढ करणेची मागणी केली आहे.

उपरोक्त सर्वबाबींची खात्री केली असता गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या थकित बाकी वसुलीच्या दाखल्याप्रमाणे येणेबाकी कमी असल्याने दिनांक ६.४.२०१८ च्या आदेशामध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी अंशतः बदल करुन खालील प्रमाणे आदेश देणे आवश्यक आहे.

## :: आदेश ::

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार, मी सतिश सोनी, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी खाली नमूद केले प्रमाणे वसुली अधिकारी यांनी वसूल करावयाच्या हुकूमनाम्याच्या / वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | वसुलीचे टप्पे | आदेशिकेचा खर्च | |
|---|---|---|---|
| १ | मागणी नोटीस | वसुलपात्र रक्कम रु. ५०,०००/- पर्यंत | रक्कम रु. ५०० किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| | | वसुलपात्र रक्कम रु. ५०,०००/- वरील रक्कमेस | वसुलपात्र रक्कमेच्या १% अथवा प्रत्यक्ष झालेला खर्च यातील जी कमी असेल ती रक्कम |
| २ | जप्ती | वसुलपात्र रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत | रक्कम रु. ४५०० किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| | | वसुलपात्र रक्कम रु. ३,००,०००/- वरील रक्कमेस | वसुलपात्र रक्कमेच्या १.५ % किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यातील जी कमी असेल ती रक्कम |
| ३ | लिलाव | वसुलपात्र रक्कम रु. ६,००,०००/- पर्यंत | रक्कम रु. १८,०००/- किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| | | वसुलपात्र रक्कम रु. ६,००,०००/- वरील रक्कमेस | वसुलपात्र रकमेच्या ३ % किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यातील जी कमी असेल ती रक्कम, परंतु एकूण वसुलीचा एकत्रित खर्च रु. १.५ लाखाच्या मर्यादेत राहील. |

**अटी व शर्ती :**

१. वसुली अधिकारी यांना हुकूमनामा/वसूली दाखला यामधील वसूलपात्र रक्कम व उपरोक्त नमूद हुकूमनाम्याच्या / वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसूली खर्च म्हणून थकबाकीदाराकडून वसूल करता येणार नाही.

२. लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर कमाल ३ % दरानेच आदेशिकेचा खर्च वसूल करता येईल, अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसूल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

३. उपरोक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसूली संस्थेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रु. १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसूल करता येईल.

४. उपरोक्त अट क्र. १ व ३ मध्ये नमूद केलेल्या रकमे व्यतिरिक्त वसूली अधिकारी यांनी जादा रक्कम वसूल केल्यास ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

५. प्रस्तुत खर्चाचा वापर वसूली अधिकारी / संस्था यांनी वसूली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी, जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

६. संस्थेने याप्रमाणे वसूल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरण निहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण करतांना खर्चाची आकारणी व त्याचा विनियोग योग्य पध्दतीने केला आहे किंवा नाही याबाबत तपासणी करुन त्याबाबतचे निष्कर्ष लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. लेखापरिक्षण अहवालामध्ये याबाबत गंभीर दोष निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेच्या निबंधकाने आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावयाची आहे.

७. सदरचे आदेश या आदेशाचे दिनांकापासून तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

18/06/19

(सतिश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
त्यांना कळविणेत येते की, त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना सदरच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत अवगत करावे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर —**

१. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई — ३२.

**प्रत -**

१. अध्यक्ष, दि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन लि., ९,विलासिनी, शिवाजी पथ, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., समोर, ठाणे (प) — ४०० ६०१.
त्यांना कळविणेत येते की, सदरचे आदेश राज्यातील सर्व जिल्हा हौसिंग फेडरेशन यांचे निदर्शनास आणून देणेत यावी.